**महाराष्ट्र शासन**

क्र.ओफएम-२०२०/प्र.क्र.१५३/ई

महसुल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दि. १७ .०४.२०२०

## कार्यालयीन आदेश

शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रसार व विषाणुचा संसर्ग होऊ नये म्हणून महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदन व पुर्नवसन अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/आ.व्य.प्र-१ दि. १५.०४.२०२० अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत केद्र/राज्य शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि. ०३.०५.२०२० पर्यत वाढविलेला आहे. मंत्रालय हे राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेचे सर्वोच्च नियंत्रण व संचालन करणारी व धोरणात्मक स्वरुपाचे निर्णय घेणारी यंत्रणा असून सद्य:स्थितीत मंत्रालय स्तरावर तातडीच्या व आणीबाणीच्या प्रसंगी धोरणात्मक निर्णय घेणे व त्यासंदर्भातील अंमलबजावणी संदर्भात क्षेत्रिय यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे व पाठपुरवा करणे क्रमप्राप्त आहे. यास्तव, सदरील अधिसूचनेनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची किमान उपस्थिती असणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार दि. २०.०४.२०२० पासून दि. ०३.०५.२०२० पर्यत, चक्राकार पध्दतीनूसार महसुल उप विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. (प्रथम आठवडा-दि.२०.०४.२०२० पासून सुरु होईल)

०२. सहसचिव /उप सचिव यांच्या उपस्थितीकरीता चक्राकार पध्दतीने (Rotational) खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

| अ.क्र | गट | वार |
|---|---|---|
| १ | **गट-अ-** (श्री चव्हाण, स.स., श्री वडते, उ.स व श्री देशमुख, उ.स.) | पहिला आठवडा-सोमवार,बुधवार व शुक्रवार. |
| २ | **गट-ब-** (डॉ. भोगले,स.स., डॉ.वीर,उ.स व श्री फल्ले, उ.स) | पहिला आठवडा- मंगळवार व गुरुवार. |
| ३ | **गट-ब-** (डॉ. भोगले,स.स., डॉ.वीर,उ.स व श्री फल्ले, उ.स) | दुसरा आठवडा- सोमवार, बुधवार, व शुक्रवार |
| ४ | **गट-अ** (श्री चव्हाण, स.स., श्री वडते, उ.स व श्री देशमुख, उ.स.) | दुसरा आठवडा- मंगळवार व गुरुवार. |

०३. विभागातील कार्यासननिहाय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीचे चक्राकार पध्दतीने (Rotational) नियोजन खालीप्रमाणे :-

| **अ.क्र** | **गट** | **कार्यासनातील सर्व अधिकारी/कर्मचारी** | **वार** |
|---|---|---|---|
| १ | **ग-अ** | ल-१, ई-६, इ-७,<br>ज-१, ई-१(अ) व इ-२<br>ई, ज-७ , ज-७(अ), म-५ व म-६,<br>ज-४, ज-४-अ, टी-१ , पीएसी व पीएसी-१<br>ज-५, ज-५-अ, ई-९,<br>ज-१-(अ) , ज-३ व ख-१ | पहिला आठवडा-सोमवार,बुधवार व शुक्रवार.<br>दुसरा आठवडा- मंगळवार व गुरुवार |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **गट-ब** | ई-१०, ज-६ व ज-६अ<br>ई-३, ई-४ , ई-४अ व ज-८<br>म-८, म-१०, म-१ व म-१(धोरण)<br>ज-९,ई-८, ई-११ , गृह व्यवस्थापन व रोखशाखा<br>ब-१, ब-२ व ल-७<br>ज-१ , ज-२ व ख-२ | पहिला आठवडा- मंगळवार व गुरुवार.<br>दुसरा आठवडा- सोमवार, बुधवार, व शुक्रवार |

४. उपरोक्त परी.२ व ३ मध्ये नमूद केल्यानुसार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत नियोजन करण्यात आले असून त्यानुसार सर्व संबधितांनी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच विभागातील काही अधिकारी/कर्मचारी हे विनापरवानगी मुख्यालय सोडून मुळगावी गेले आहेत असे निदर्शनास आले आहे. त्यांनी देखील सदर आदेश प्राप्त होताच संबधीत जिल्हाधिकारी/ पोलिस अधिक्षक यांचेशी संपर्क साधून स्वत: वाहन व्यवस्था उपलब्ध करुन परिस्थितीनुरुप मंत्रालयात कर्तव्यावर रुजू व्हावे.

तसेच विभागाची आस्थापना शाखा (ई) व नोंदणी शाखा दररोज चालू राहणे आवश्यक असल्याने संबधित उप सचिव आणि कक्ष अधिकारी (ई) व नोंदणी शाखा प्रमुख यांनी आस्थापना व नोंदणीशाखेतील कर्मचाऱ्यांचे उपस्थितीचे नियोजन करावे व सदर शाखा दररोज सुरु राहतील याची दक्षता घेण्यात यावी.

विभागातील अपर मुख्य सचिव (महसुल) यांच्या कार्यालयातील स्वीय सहायक व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी आळीपाळीने कार्यालयात उपस्थित राहवे. तसेच, सह सचिव/उप सचिव यांचे स्वीय सहायक, लघुलेखक तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना नेमून दिलेल्या अधिकारी वर्ग/ कार्यासन निहाय उक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार त्या त्या दिवशी कार्यालयात उपस्थित रहावे.

याशिवाय, वेळोवेळी उदभवलेल्या तातडीच्या प्रसंगी अमुस/स.स./उ.स. यांनी दिलेल्या निर्देशानुसार त्यांच्या अधिनस्त संबधीत अधिकारी/कर्मचारी यांनी आवश्यकतेप्रमाणे कर्तव्यात उपस्थित राहावे.

तसेच, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी सदर दिवशी विभागाशी संबधित अत्यावश्यक तातडीची कामे पार पाडणे आवश्यक आहे. वरील अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहण्याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपत्कालीन व्यवस्थेसाठी केलेल्या परिवहन सेवेचा अथवा अन्य उपलब्ध पर्यायांचा वापर करावा. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

(रविराज फल्ले)
**उप सचिव, महसुल व वन विभाग.**

**प्रत,**

१) अप्पर मुख्य सचिव महसुल वन विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी
२)सर्व संबधित अधिकारी/कर्मचारी यांना मेल व व्हाटसअप द्वारे,
३) निवड नस्ती.

Scanned by CamScanner